REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ३० ऑगस्ट, १९४४ अंक ३५

धी

## बॉम्बे को-ऑपरेटिव
## इन्शुअरन्स सोसायटी लि.

| | | |
|---|---|---|
| नवीन काम ( १९४३ ) | रु. | ३९,२७,६१९ |
| एकंदर चालू विमे | रु. | १,६१,९०,५४१ |
| जीवन विमा निधि | रु. | २२,१५,९७४ |
| कुल उत्पन्न | रु. | १०,३३,००० |

अध्यक्ष : शेठ माधवलाल मकनजी भट्ट, जे. पी.
मॅनेजर : श्री. जी. एच. ठाकोर, एम्. ए. (कॅंटब.)

महाराष्ट्र-कर्नाटकचे चीफ ऑर्गनाइझर्स :

**श्री. कुळकर्णी आणि कं.**

मुख्य कचेरी :

**को-ऑपरेटिव इन्शुअरन्स बिल्डिंग,**
सर फिरोजशाह मेहता रोड, कोट, मुंबई.

**हिंदुस्थानची आघाडीवरील सहकारी संस्था**

## दि बॅंक ऑफ महाराष्ट्र लि.
### पुणें शहर

भांडवल :
( ता. ३१-५-४४ रोजीं )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें | : | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | : | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | : | रु. १,०८,००० |
| एकुण खेळतें भांडवल | : | रु. ७५,००,००० चे वर |

—: डायरेक्टर्स :—

श्री. भों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. मोहनी,
श्री. फ. दो. पद्मजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख

: शाखा :

पुणें ८, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.
बॅंकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

Telephone 779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

गिरगांव
मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक,
पुणें

## बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

## नोटीस

या बँकेच्या सर्व मेंबरांस कळविण्यांत येतें कीं बँकेची सर्वसाधारण सभा बुधवार ता. २० सप्टेंबर १९४४ इ. चे दिवशीं दुपारीं ३ वाजतां साने मेमोरियल हॉलमध्यें बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेल्या विषयांचा विचार करण्याकरतां भरणार आहे, तरी त्यावेळीं सर्व मेंबरांनीं हजर रहावें अशी विनंति आहे.

बोर्डाचे हुकुमावरून.

बार्शी, ता. ५-८-४४. र. प. पटवर्धन
मॅनेजर.



## गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.

A 9

क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा अनुभविक उपाय म्हणून 'एनाईन' वापरतात.

अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २


# विविध माहिती

### परीक्षा म्हणजे सोडतच होय !

"विश्वविद्यालयांची हल्लींची परीक्षा घेण्याची पद्धति विद्यार्थ्यांस अति जाचक आहे. एकच उत्तरपत्रिका दोन परीक्षकांनीं तपासली किंवा एकाच परीक्षकानें दोनदां तपासली, तर तिला वेगवेगळे गुण पडतात! एकाच विषयांत विद्यार्थी नापास झाला तरी त्याला वर्षभर सर्व विषयांचा अभ्यास पुनः करावा लागतो. परीक्षेची पद्धत म्हणजे एक प्रकारची सोडतच आहे."—आलिगड विश्व-विद्यालयाचे उपकुलगुरु सर झियाउद्दिन अहमद ह्यांचें सुरत कॉलेजांतील भाषण.

### इंपीरिअल बँकेचा सहामाही अहवाल

" इंपीरिअल बँकेला ३० जून अखेर संपलेल्या वर्षी ४६ लक्ष रुपये निव्वळ फायदा झाला. डिव्हिडंडचा दर ( १२% कर माफ ) कायम आहे. बँकेच्या पैशास चांगली मागणी होती, परंतु पैशाचा पुरवठाहि भरपूर होता. हिंदुस्थान सरकारच्या ट्रेझरी बिलावर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आणे पडला; १९४३ च्या पहिल्या सहामाहींत तो १ रु. १ आ. २ पै इतका पडला होता."

### पुण्यांतील रेशनिंग

पुण्यांत रेशनिंगला प्रारंभ झाला, त्यास ५ जुलै रोजी एक वर्ष पूर्ण झालें. कामाच्या सोयीसाठी रेशनिंगच्या हद्दीचे सहा भाग करण्यांत आले आहेत. रेशनिंगपूर्वी, रेशन केलेला माल विकणारे १०० घाऊक व्यापारी होते. त्यांनीं आतां डेपोमार्फत व्यवहार करण्यासाठी असोसिएशन्स स्थापन केल्या आहेत. किरकोळ व्यापारी ह्या डेपोंतून माल घेतात. रेशनिंगला प्रारंभ झाला, तेव्हां रेशन केलेला माल विकण्याचे परवाने ८१८ किरकोळ व्यापाऱ्यांना दिले होते. आतां फक्त ५८८ किरकोळ लायसन्सदार उरले आहेत. रेशनिंगच्या नियमांचा भंग केल्याबद्दल १३ लायसेन्स रद्द करण्यांत आले व २३ लायसेन्सदारांवर खटले भरण्यांत आले.

### अहमदाबादमधील गिरण्यांची चलती

सबंद हिंदुस्थानांत गेल्या वर्षी जेवढें कापड तयार झालें, त्याच्या २५% कापड एकट्या अहमदाबादमधील गिरण्यांनीं उत्पादन केलें. कापड व सुत ह्यांच्या विक्रीचा आकडा १९४२ चे मानानें दीडपट झाला. उत्पादनाचा खर्च व कपास आणि सुत ह्यांची किंमत १००% वाढली तरी ठोक नफा २२५% वाढला. कारखान्यांच्या यंत्रांवर जास्त ताण पडला तरी १९४३ सालीं घसाऱ्यासाठी काढलेल्या रकमेंत वाढ झालेली दिसत नाहीं. अहमदाबादच्या इतिहासांत १९४३ हें वर्ष फारच भरभराटीचें गेलें.

### १६ हजार " स्मिथ "

अमेरिकन आरमारदलांत एकट्या " स्मिथ " या नांवाचे १६००० खलाशी आहेत. तेव्हां त्यांचा पत्ता लिहितांना त्यांचें सबंध नांव लिहिण्याविषयीं सूचना देण्यांत आलेली आहे. दर आठवड्यास ३० लक्ष पत्रें योग्य ठिकाणीं न पोचण्याचें कारण वरील सूचनेचे अनुषंगानें लक्षांत येईल.

### " विवाहावरील निर्बंध दूर करा "

" बँक ऑफिसर्स गिल्ड " ह्या ग्रेट ब्रिटनमधील बँकांतील अधिकाऱ्यांच्या संस्थेनें बँकांतील स्त्री-नोकरांनीं विवाहबद्ध होतां कामा नये, असा नियम आहे तो रद्द करावा असा ठराव पास केला आहे. स्त्रिया व पुरुष ह्यांस सारख्या कामासाठी सारखा पगार व सारख्या सवलती मिळाल्या पाहिजेत, असाहि ठराव मंजूर झाला.

### चेकसची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें ११ ऑगस्ट अखेर संपलेल्या आठवड्यांत ४०३ कोटि रुपयांच्या १,५८,६९२ चेक्सची देवघेव झाली.

### हिंदुस्थानांत गव्हाची आयात

१५ ऑगस्ट रोजीं संपलेल्या आठवड्यांत परदेशांतून १५,००० टन गव्हाची हिंदुस्थानांत आयात झाली, अशी बातमी आहे.

### ससांची आयात

लष्करांतील सैनिकांच्या खाद्यासाठी ऑस्ट्रेलियांतून व इतर देशांतून १० हजार ससे आणविण्यांत येणार आहेत व सर्व हिंदुस्थानभर सशांच्या पैदाशीचीं व संगोपनाचीं केंद्रें स्थापन करण्यांत यावयाचीं आहेत.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २७४ | ६ स्फुट विचार ... | २७७ |
| २ सहकारी रजिस्ट्रार्सची परिषद ... | २७५ | इंस्टिट्यूट व बँका ह्यांची परिषद—स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार—शत्रु-व्याप्त प्रदेशांतील जिंदगी व ताळेबंद—पत्रकारांची आर्थिक स्थिति | |
| ३ आर्थिक अभिवृद्धीच्या योजना ... | २७६ | ७ महाराष्ट्र को. स्कूल ... | २७८ |
| ४ औद्योगिक सहकारी संघटन मंडळ ... | २७६ | ८ जमाखर्चाची पद्धत ... | २७८ |
| ५ बार्शी सें. को. बँक ... | २७६ | ९ वहापुरी संबंधीं रिपोर्ट | २७९ |



# अर्थ

बुधवार, ता. ३० ऑगस्ट, १९४४


## सहकारी रजिस्ट्रार्सची परिषद

रिझर्व्ह बँकेच्या कारभारांत एक शेतीविषयक विभाग आहे. त्याचा सहकारी बँकांच्या पैशाच्या व्यवहाराशीं प्रत्यक्ष संबंध येतो. प्रांतिक सहकारी बँकांस रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत शेड्यूल्ड बँकेचें स्थान देण्यांत आलें आहे आणि त्यांच्या मार्फत सहकारी शेती संस्थांस विशिष्ट अटींवर जरूर पडेल तसा पैशाच्या पुरवठ्याच्या सवलती दिल्या जाण्याची तरतूद केलेली आहे. ह्या बाबतींतल्या कित्येक अडचणी सहकारी बँकांनीं रिझर्व्ह बँकेपुढें मांडल्या असून त्या दूर केल्या जाण्याविषयीं चर्चा व विचार-विनिमय हीं झालीं आहेत. हे परस्पर संबंध लक्षांत घेतां प्रांतिक व संस्थानी रजिस्ट्रार्सची वेळोवेळ भरणारी परिषद यंदां रिझर्व्ह बँकेच्या विद्यमानें भरवली गेली ही गोष्ट महत्त्वाची झाली. ह्या परिषदेचें अध्यक्षपद नेहमींच्या रिवाजाप्रमाणें मध्यवर्ती सरकारचे मंत्रि, सर जोगेंद्रसिंग, ह्यांनीं विभूषित केलें आणि तीमध्यें रजिस्ट्रार्सच्या बरोबर बिनसरकारी सहकारी कार्यकर्त्यांनीं भाग घेतला. ह्या परिषदेच्या अगोदर मुंबई येथेंच प्रांतिक बँका व प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट्स ह्यांच्या स्थायी समित्यांची सभा भरली होती आणि तींत कांहीं प्रांतिक रजिस्ट्रार्स उपस्थित होते. ह्या सभेस सामान्य परिषदेचें स्वरूप येतें आणि तीमध्यें सहकारी चळवळीच्या हिताविषयींच्या प्रश्नांची चर्चा होऊन त्यांवर ठराव मान्य करण्यांत येतात. युद्धजन्य परिस्थितीचे सहकारी चळवळीवर घडून आलेले परिणाम आणि युद्धोत्तर काळांतील पुनर्घटनेंत तिला द्यावयाचें स्थान ह्या विषयांची चर्चा दोन्ही परिषदांमध्यें प्रामुख्यानें केली जाणें स्वाभाविक होतें. रजिस्ट्रार्सच्या परिषदेंत मान्य झालेल्या ठरावांचा परिणाम रिझर्व्ह बँक व प्रांतिक आणि हिंदुस्थान सरकार ह्यांच्या धोरणावर होण्याची अधिक शक्यता असल्यानें त्यांस विशेष महत्त्व आहे. ह्याकरितां आम्ही येथें त्यांपैकीं प्रमुख ठरावांचें दिग्दर्शन करीत आहों.

सहकारी संवर्धनाची योजना तयार करण्यासाठी परिषदेनें एक समिती नेमली आहे. अशा योजना स्थानिक व प्रांतिक परिस्थितीस अनुसरून आखाव्या लागतील आणि हें काम प्रांतांनीं स्वतःसाठी निरनिराळें केलें पाहिजे हें उघड आहे. तथापि, ह्या योजनांची सर्वसामान्य रूपरेषा वरील समितीस तयार करतां येईल. ह्याहिपेक्षा महत्त्वाची गोष्ट आहे ती सबंद हिंदुस्थानाकरितां आर्थिक अभिवृद्धीची योजना तयार होईल तीमध्यें सहकारी संघटनास उचित स्थान दिलें जाण्याच्या आवश्यकतेसंबंधाची आहे. रजिस्ट्रारांच्या परिषदेनें ह्या सूचनेस पाठिंबा दिला आहे एवढेंच नव्हे तर मध्यवर्ती, प्रांतिक व संस्थानी सरकारें आपापल्या पुरत्या आर्थिक अभिवृद्धीसाठी योजना तयार करण्यासाठी समित्या नेमतील त्यांमध्यें सहकारी संघटनांतील कार्यकर्त्यांचे प्रतिनिधी घेतले जावे असें आपलें मत तिनें व्यक्त केलें आहे. सहकारी प्रांतिक बँका व इंस्टिट्यूटस ह्यांच्या परिषदेनेंहि अशाच अर्थाचा ठराव मंजूर केला होता आणि त्यास रजिस्ट्रार्सच्या परिषदेनें पाठिंबा दिला आहे हें समाधानकारक आहे. एखादी प्रगतीची योजना यशस्वी होण्यास विवक्षित गटांतील सर्व लोकांचें सहकार्य अपरिहार्य असेल तेथें तें सक्तीचें केलें जावें ह्या परिषदेच्या शिफारसीचा उद्देश थोड्या लोकांनीं अभिवृद्धीच्या मार्गांत अडथळे आणूं नयेत हा आहे. अन्नसामुग्रीचें उत्पादन वाढवण्याच्या कामीं सरकारनें सहकारी संस्थांचा पूर्ण उपयोग करून घ्यावा आणि त्या संबंधांत जरूर असलेलें सर्व सहाय त्यांस द्यावें असें परिषदेनें म्हटलें आहे. हें सहाय भांडवल, बीं-बियाणें, इत्यादि निरनिराळ्या स्वरूपांत दिलें जावें अशी आणि रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या १७ व्या कलमाअन्वयें सहकारी बँकांस विशिष्ट तारणावर थोड्या मुदतीपुरता पैसा मिळेल अशी व्यवस्था होण्याबाबतहि शिफारस परिषदेनें केली आहे. मालाच्या विक्रीची व्यवस्था सहकारी पद्धतीनें होण्यासाठी संस्था विस्तृत प्रमाणांत चालवल्या जाण्याची आणि त्यांचा कारभार यशस्वी रीतीनें केला जाण्याकरितां सरकारनें मदत व सवलती देण्याची आवश्यकता परिषदेनें आवश्यक असे ठराव मंजूर करून प्रतिपादली आहे. अशाच प्रकारचे ठराव सहकारी स्टोअर्सच्या बाबतींतहि तिनें केले आहेत. युद्धपरिस्थितींत निघालेलीं दुकानें युद्धाचे अखेर बऱ्याचशा प्रमाणांत चालणें कठिण होईल आणि त्यांपैकीं कित्येक बंद पडतील अशी भीति वाटत आहे. ह्यासंबंधांत सरकारचें धोरण ह्या संस्थांस उत्तेजन देऊन त्या भक्कम पायावर उभ्या रहातील अशा तऱ्हेचें असावें ह्या आशयाची शिफारस परिषदेनें केली आहे.

एका नवीन आणि महत्त्वाच्या विषयाबाबत परिषदेनें सूचना केल्या आहेत तो सहकारी घटनेच्या औद्योगिक सोसायट्यांसंबंधांतला आहे. लहान गावांत व खेडेगावीं विभागांत मालाचें उत्पादन सहकारी पद्धतीनें व्हावयाचें म्हणजे भांडवल, साधी यंत्रसामुग्री, तज्ज्ञांचा सल्ला, विक्रीची व्यवस्था इत्यादि गोष्टींची तयारी हवी आणि ती सरकारच्या मदतीवांचून होणें शक्य नाहीं. हें सहाय मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांकडून कसें मिळावें ह्याची तपशीलवार तजवीज परिषदेनें सुचवली आहे. सहकारी शिक्षणाच्या महत्त्वाचे दृष्टीनें कोणत्या योजना सरकारनें अंमलांत आणल्या पाहिजेत ह्याचें दिग्दर्शन तिनें केलें आहे. त्याचप्रमाणें सहकाराबाबत संशोधन केलें जाण्याची व्यवस्थाहि तिनें सुचवली आहे. सहकारी संस्थांची स्थिति आणि प्रगति ह्यांचेविषयींची आकडेवार माहिती प्रसिद्ध होत असते तिच्या पद्धतींत जरूर असलेल्या सुधारणा सुचवण्यासाठी परिषदेनें एक उपसमिती नेमली आहे. तिच्या शिफारसींचा गोषवारा येथवर दिला आहे त्यावरून त्यांचें महत्त्व ध्यानांत येण्यासारखें आहे. रिझर्व्ह बँकेच्या विद्यमानें आणि मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांचे अध्यक्षतेसाठी भरलेल्या रजिस्ट्रारांच्या परिषदेच्या ह्या सूचना असल्यानें त्यांचा परामर्श योग्य रीतीनें घेतला जाईल अशी अपेक्षा आहे.

## आर्थिक अभिवृद्धीच्या योजना

हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीच्या योजनांत सहकारी औद्योगिक संस्थांस महत्वाचें स्थान देण्यांत यावें ह्या अर्थाच्या सूचना करण्यांत येत आहेत. मुंबईस भरलेल्या दोन सहकारी परिषदांचा उल्लेख ह्या अंकांत करण्यांत आला आहे, त्यांच्या चर्चेत सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या औद्योगिक मंडळ्यांच्या स्थापनेस महत्व देण्यांत आलें आहे. सध्यां जनतेपुढें युद्धोत्तर काळांत करावयाच्या हिंदुस्थानच्या औद्योगिक संवर्धनाच्या योजना आहेत, त्यांत सरकारच्या सहाय्यानें भांडवलदारीच्या पद्धतीनें किंवा रशियांत चालू असलेल्या समाजसत्तामूलक व्यवस्थेनें उदयास आणावयाच्या आर्थिक संस्थांविषयींच्या सूचना अंतर्भूत आहेत. हिंदुस्थान सरकारहि अभिवृद्धीच्या योजना आखीत आहे. धंद्यांचें स्वरूप व संख्या, त्यांस लागणाऱ्या भांडवलाचें परिमाण व तें मिळवण्याचे मार्ग, जनतेच्या रहाणींत सुधारणा व तिच्या प्राप्तींत वाढ ह्यांच्या दृष्टीनें करावयाच्या संपत्तीच्या उत्पादनांत विस्तार इत्यादि बाबींची चर्चा ह्या योजनांत अर्थातच केलेली आढळते. तथापि, धंदे व व्यापार, ह्यांचा विस्तार हजारो कोटि रुपये खर्चून हिंदी राष्ट्र करणार त्यावर सत्ता कोणाची राहील, त्याचें धोरण कोण ठरवील, कारखान्यांची मालकी भांडवलदारांच्या हातीं वैयक्तिक व सामुदायिक रीत्या राहील किंवा राजसत्ता ह्या सर्व आर्थिक घडामोडींचें पूर्णत्वानें अथवा अंशतः नियंत्रण करील ह्या मुद्यांचें स्पष्टीकरण अजून झालेलें नाहीं. युद्धोत्तर आर्थिक विकासाच्या योजना इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतहि आखल्या जात आहेत आणि हिंदुस्थानची औद्योगिक घटना त्या देशांत रूढ झालेल्या पद्धतीनेंच येथें चालू झाली असल्यानें त्यांचें अनुकरण ह्या देशांतहिं व्हावें अशी अपेक्षा आहेसें दिसतें. प्रचंड प्रमाणावर आर्थिक पुनर्रचना हिंदुस्थानांत कर्तव्य असतां ती रशियांत यशस्वी झालेल्या पद्धतीनें केली असतां अधिक इष्ट नाहीं काय ! असा प्रश्न येथें विचारला जात आहे.

---

## औद्योगिक सहकारी संघटन मंडळ

एका टोकास वैयक्तिक स्वार्थ, स्वातंत्र्य व स्पर्धा आणि त्यांचेमधून उत्पन्न होणारी आर्थिक सुधारणा आणि दुसऱ्या टोकास श्रमजीवी बहुजन समाजाच्या आर्थिक संघटनेनें राष्ट्रीय राजकीय सत्तेनें घडवून आणलेली व चालवलेली औद्योगिक व्यवस्था अशा ह्या मूलग्राही भेदाच्या योजना आहेत. एकीचा पाया वैयक्तिक मालकीचीं संपत्त्युत्पादनाचीं साधनें तर दुसरीमध्यें ह्या साधनांचें मध्यवर्ती राजकीय सत्तेच्या हातीं केंद्रीकरण व वैयक्तिक आर्थिक स्वातंत्र्याचा अभाव पण सर्व व्यवसायी लोकांस समतेवर आधारलेल्या प्राप्तीची तरतूद. ह्या दोन टोकांच्यामध्यें वैयक्तिक आर्थिक स्वातंत्र्य आणि लहानमोठ्या उत्पादकांचें स्वावलंबन व सहकार ह्यांच्या पायावर सामाजिक घटना उभी करणें शक्य व इष्ट असें कित्येक विचारवंत मानतात. त्यांच्या मतें हिंदुस्थानांतील युद्धोत्तर आर्थिक संवर्धन ह्या तत्वावर आणि पद्धतीनें केलें पाहिजे. ह्या उद्देशानें त्यांनीं संघटनाचा व प्रचाराचा उपक्रम "हिंदी औद्योगिक सहकारी संघटना मंडळ" ( Indian Industrial Co-operatives Association P. B. 115 Bombay ) स्थापन केलें असून त्याच्या घटनेस प्रसिद्धी दिली आहे. ह्या घटनेची चर्चा व्हावी आणि लोकांनीं आपले अभिप्राय व सूचना आपणाकडे पाठवाव्या अशी उत्पादकांची इच्छा आहे. सरकारी नोकरशाही, भांडवलवाले, दलाल इत्यादि लोकांच्या वर्चस्वापासून कामकऱ्यांचें रक्षण करून त्यांस स्वतःच्या पायावर उभें रहाण्यास व परस्पर सहाय्यानें आपले धंदे चालवण्यास समर्थ करणें हा वरील उपक्रमाचा हेतु आहे. चीन देशांत अलीकडे लहान व मध्यम आकाराचे धंदे सहकारी पद्धतीनें यशस्वी रीतीनें चालवले जात आहेत आणि त्यांच्या धर्तीवर हिंदुस्थानांत आर्थिक संवर्धन झाल्यास भांडवलशाही आणि आत्यंतिक स्वरूपाची समाजसत्ता पद्धति ह्यांचे दोष टाळून सर्वांस मान्य असलेलें आर्थिक व सामाजिक उन्नतीचें उद्दिष्ट साध्य करतां येईल. हिंदी औद्योगिक सहकारी संघटन मंडळास आम्हीं यश चिंतितों.

---

## बार्शी सें. को. बँक लि.

( वार्षिक सभा : २०-९-१९४४ )

वरील बँकेच्या पटावर एकूण ९२७ सभासद असून त्यांपैकी ५२ सोसायट्या व व्यक्तिशः सभासद ८७५ आहेत. ह्याशिवाय ३१ नाममात्र सभासद नोंदलेले आहेत. बँकेचें शेअर भांडवल ७२,१५० रुपये असून रिझर्व्ह आणि इतर फंडांत ८३,४४९ रुपये आहेत. अहवालाचे वर्षी ठेवींत १¾ लक्ष रुपयांची वाढ होऊन त्यांचा आकडा ७,६९,०१० रुपये झाला. ह्या उलट कर्ज व्यवहारांत ३८,९९८ रुपयांची घट होऊन वर्षअखेर ४,०३,९७९ रुपयांचें कर्ज येणें आहे. बँकांतील ठेवींमधील व रोख्यांतील गुंतवणूक १,८७,५५७ रुपयांनीं वाढून ती साल अखेर ५,२७,९५० रुपये झाली आहे. बँकांतील शिल्लक व इन्व्हेस्टमेंटस ह्यांचें एकूण ठेवींशीं प्रमाण ६८% पडतें, व एकूण कर्जव्यवहाराचें एकूण ठेवींच्या रकमेशीं प्रमाण ५२% आहे, ह्या गोष्टींवरून बँकेच्या व्यवहाराच्या सुरक्षितपणाची व किफायतशीरपणाची कल्पना येईल. थकबाकीचा आकडा अहवालाचे वर्षांत थोडा उतरून तो ४३,१०१ रुपयांवर आला. बँकेच्या वैराग शाखेचें काम समाधानकारक चाललें आहे. वैरागच्या शेजारच्या पांच खेड्यांतील रहिवाशांना धान्य पुरविण्याचें काम सरकारनें शाखेकडे १५-६-४४ पासून दिलें आहे. वर्षअखेर बँकेस ६,६४४ रु. निव्वळ नफा झाला. भागीदारांस ६¼% डिव्हिडंड मिळणार आहे. बँक "अ" वर्गांत आहे. श्री. म. रा. साने, वकील, हे बँकेचे चेअरमन असून श्री. र. . पटवर्धन, सी. ए., आय. आय. बी. हे मॅनेजर आहेत.

---

## विटा मर्चंटस को. बँक लि., विटें

वरील बँकेचें भाग भांडवल २२,२९० रुपये आहे. रिझर्व्ह व इतर फंडांत २,८३९ रुपये आहेत. एकूण ठेवी १,१६,२१८ रुपयांच्या आहेत. एकूण १ लक्ष, ४६½ हजार रुपये खेळत्या भांडवलापैकी ६२,८८६ रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. "गेल्या सालची थकबाकी पूर्णपणें वसूल झाली असून अहवालाचे साल अखेरीस थकबाकी कांहीं नाहीं. विशेषतः माल तारणाचे धंद्यापासून अहवालाचे सालीं बँकेस बराच फायदा झाला आहे." बँकेस निव्वळ नफा ३,८०१ रुपये झाला. भागीदारांस ७½% डिव्हिडंड मिळालें. श्री. फुलचंद रुपचंद शहा, व्यापारी, हे बँकेचे चेअरमन असून श्री. वा. गो. बर्वे, बी. ए., एलएल. बी. हे मॅनेजर आहेत.

# स्फुट विचार

### इंस्टिट्यूटस व बँका ह्यांची परिषद

आजच्या अग्रलेखांत रजिस्ट्रार्सच्या परिषदेपूर्वी मुंबई येथें भरलेल्या अखिल भारतीय सहकारी प्रांतिक बँकांच्या आणि इंस्टिट्यूटसच्या असोसिएशन्सच्या सभेचा उल्लेख करण्यांत आला आहे आणि ह्या सभेस परिषदेचें स्वरूप येत असतें असें म्हटलें आहे. मुंबईच्या प्रांतिक इंस्टिट्यूटचे अध्यक्ष, सर जनार्दन मदन, ह्यांनीं सदरहु सभेचें उद्घाटन केलें आणि अध्यक्षीय भाषण दि. बा. काजी ह्यांनीं केलें. इंस्टिट्यूटस आणि बँका ह्यांच्या स्थापनेचें बीजारोपण मुंबईमध्यें आपण स्वत: प्रांतिक रजिस्ट्रार असतांना झालें ह्याविषयीं सर जनार्दन ह्यांनीं अभिमानपूर्वक उल्लेख केला. धान्यादि अन्नसामुग्रीच्या वाटणीचें काम सहकारी संस्थांच्या हातून उत्तम रीतीनें होण्यासारखें असल्यानें मुंबईच्या इंस्टिट्यूटनें त्यासंबंधांत प्रचार चालू केला आणि त्यासंबंधांत समाधानकारक प्रगति घडून आल्याचें त्यांनीं सांगितलें. ह्या प्रांतांत सहकारी दुकानांच्या चळवळीचा म्हणण्यासारखा प्रचार झालेला नव्हता. परंतु युद्धपरिस्थितीमुळें ह्या संघटनास चालना मिळाली आणि कित्येक शहरांत आतां स्टोअर्स निघाले आहेत, त्यांची माहिती त्यांनीं दिली. सहकारी पुनर्घटनेची योजना आखण्याबाबत मुंबईच्या इंस्टिट्यूटनें पुढाकार घेतला आणि प्रांतिक सरकारच्या संमतीनें एक योजनासमिती नेमली. तिच्या सूचना सरकारास सादर करण्यांत आल्या आहेत असें सर जनार्दन म्हणाले. शेतमालास बऱ्या किंमती येत आहेत, त्यांचे मधून बचत करण्याकडे शेतकऱ्यांचें मन वळवलें जाण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादिली. आर्थिक पुनर्घटना आणि सहकारी संस्थांचा विस्तार व सुधारणा ह्यांचेसाठी माहितगार व शिकलेले मार्गदर्शक व नोकर लागतील, त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था सहकारी इंस्टिट्यूटसनीं केली पाहिजे आणि त्यासाठी मुंबई प्रांतिक इंस्टिट्यूटनें आपल्या पूर्वीच्या शाळा पुन्हां चालू केल्या असल्याचें त्यांनीं सांगितलें. इंस्टिट्यूटच्या कार्यक्षेत्रास अलीकडे मर्यादा घालण्यांत आली आहे तरी शिक्षणाच्या बरोबर बिनअधिकारी सहकारी कार्यकर्त्यांचें विविध प्रश्नांविषयींचें मत तयार करून तें व्यक्त करण्याचें कार्य त्या संस्थेनें आस्थेनें केलें पाहिजे असें सुचवून सर जनार्दन ह्यांनीं आपलें भाषण पुरें केलें.

---

### स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार

म्युनिसिपालिटयांचा व लोकलबोर्डें ह्यांची आर्थिक परिस्थिति १९४२ सालीं असमाधानकारकच राहिली. युद्धामुळें किंमतींत झालेली वाढ व नोकरवर्गास द्यावा लागणारा महागाईभत्ता ह्यांची त्यांत भर पडली. त्या कारणानें कित्येक स्थानिक स्वराज्य संस्थांना आपलीं कामें नीट पार पाडतां आलीं नाहींत. विशिष्ट कार्यासाठी राखून ठेवलेला पैसा नित्य कामासाठी वापरणें व देणीं देण्याचें पुढें ढकलणें हाहि त्याचा परिणाम घडून आला. प्राथमिक शिक्षणावरील खर्च कमी करावा लागल्यामुळें कांहीं स्कूल बोर्डांच्या परिस्थितीस झळ लागली. वसुली अधिकाऱ्यांत कामाच्या तत्परतेचा व देखरेखीचा अभाव आणि वसुलीसाठी कडक इलाज करण्याची म्युनिसिपालिटयांची नाखुषी ह्या कारणांमुळें वसुलीची बाकी फारच राहिली. इंदापूर येथें ७८·९%, होनावर येथें ५७% व यावल येथें ६५% बाकी राहिली. स्थानिक स्वराज्य संस्थांचा गैरशिस्त कारभार ही आब सार्वत्रिक कुचेष्टेचा विषय झालेला आहे व त्यासंबंधांत सुधारणा होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत, हें दुर्दैव आहे.

---

### शत्रुव्याप्त प्रदेशांतील जिंदगी व कंपन्यांचे ताळेबंद

रिझर्व्ह बँकेस गेल्या वर्षी १०½ कोटि रुपयांचेवर नफा झाला असला तरी तिच्या ताळेबंदांत जिंदगीचे बाजूस दाखविलेली ६,१३,७६३ रुपयांची मालमत्ता सध्या शत्रुपक्षाच्या हातांतील प्रदेशामधील डेड स्टॉकच्या स्वरूपांतील आहे. हिंदी मध्यवर्ती बँकेनें इतक्या विश्वासानें ही मालमत्ता जिंदगीचे बाजूस दाखवूनच नफ्याचा आकडा काढणें ही गोष्ट सूचक आहे. शत्रूनें व्याप्त केलेले प्रदेश ब्रिटिश सरकारचे ताब्यांत पुन: येतील व आपली जिंदगी खरी ठरेल, ही निश्चित अपेक्षा तिचे मुळाशीं आहे. ग्रेट ब्रिटनमधील एक्सचेंज बँका, पूर्व आशियांत व्यवहार करणाऱ्या रबराच्या व इतर कंपन्या, इत्यादि मंडळयांनीं हेंच धोरण अंगीकारलेलें आहे व त्यांच्या ताळेबंदांतहि, त्यांची जिंदगी परमुलुखांत आज अडकली असली तरी ती खरें येणें ह्याच स्वरूपांत ताळेबंदांत दाखविलेली असते. सामान्य व्यवहारांत निघणारें संशयित व बुडीत येणें व युद्धासारख्या तात्कालिक कारणामुळें येणें अधिकारक्षेत्राबाहेर जाणें, ह्यांत फरक आहे. रिझर्व्ह बँकेच्या एकूण व्यवहाराच्या मानानें तिच्या जिंदगीमधील ६ लक्ष, १३½ हजारांचा आकडा अत्यंत गौण महत्त्वाचा आहे. कांहीं ब्रिटिश बँकांची बहुतेक सर्वच जिंदगी शत्रुप्रदेशांत अडकली असली, तरी त्या कंपन्यांच्या ताळेबंदांस त्यानें बाध आलेला नाहीं.

---

### पत्रकारांची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठी सूचना

मराठी पत्रकार परिषदेच्या स्थायी समितीनें परिषदेच्या कोल्हापूर येथील अधिवेशनांत मंजूर झालेल्या ठरावास अनुसरून मराठी पत्रकारांची आर्थिक स्थिति सुधारण्याच्या उद्देशानें किमान पगार ( मुंबई येथें १२५ रु., पुणें व नागपूर येथें १०० रु. व इतर ठिकाणीं ७५ रु. ), हक्काची रजा, प्राव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी, महागाई भत्ता व बोनस, पगारवाढ, नियमित पगार, पेन्शन, वगैरे संबंधांत कांहीं शिफारसी केल्या आहेत. पत्रकारांची व वार्ताहरांची परिस्थिति ज्यांस माहीत आहे, अशांना ह्या मागण्या रास्तच वाटतील. किरकोळ नियतकालिकें सोडलीं, तरी बाकीच्या नीट चाललेल्या नियतकालिकांच्या चालकांनीं ह्या बाबतींत लक्ष घालणें आवश्यक आहे. निदान सुस्थितींतील नियतकालिकांनीं पुढाकार घ्यावा व इतरांस मार्गदर्शक व्हावें, हें उचित आहे. वर्तमानपत्रें कोठल्याहि अन्यायास वाचा फोडण्याचें श्रेय नेहमीं घेतात, त्यांनीं स्वत:च्या नोकरवर्गाच्या रास्त गाऱ्हाण्यांचें बाबत जास्तच सहानुभूतिपर धोरण ठेवणें इष्ट आहे.

---

### युद्धोत्तर पुनर्घटना सहकारी तत्त्वावर : श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचें भाषण

" हिंदी युद्धोत्तर पुनर्घटना सहकारी तत्त्वावर का आंखण्यांत यावी ? " ह्या विषयावर श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचें बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणें येथें मंगळवार, ता. २९ रोजीं व्याख्यान झालें. " कोणतीहि सुधारणा घडवून आणतांना, तिच्यापासून होणाऱ्या फायद्याचा हिस्सा सर्वांस योग्य रीतीनें मिळेल किंवा नाहीं, हें पहाणें अगत्याचें असतें. भांडवलशाहीमधील कांहीं चांगल्या गोष्टी कायम ठेवून परंतु त्यामधील दोष काढून नफ्याची वाटणी योग्य रीतीनें करण्याचें कार्य सहकारी संघटनच करूं शकेल व त्यामुळें उत्पादन वाढविण्यांत सर्वांचें हित राहील." असें ते म्हणाले.

## महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें

( डि. आ. म. )

जुलै ता. १७ पासून या वर्गाचें काम व्यवस्थित सुरू झालें असून शाळेचे वर्ग पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या हॉलमध्यें रोज सकाळीं ८ ते १० व सायंकाळीं ६ ते ८ पर्यंत नियमितपणें भरतात. शाळेच्या सीनिअर कोर्ससाठी दहा व ज्यूनिअर कोर्ससाठीं सहा मिळे एकूण सोळा विद्यार्थी नियमितपणें हजर असतात. शिक्षणाचें माध्यम मराठी असून श्री. भिडे व देशपांडे या तज्ज्ञ व कुशल अध्यापकांवर विद्यार्थी वर्ग खूष आहे.

विद्यार्थ्यांसाठीं शाळेचें एक वाचनालय असून त्यांत अभ्यासक्रमास पोषक अशीं पुस्तकें ठेवलीं आहेत. सर्व विद्यार्थी त्यांचा उपयोग भरपूर करून घेत असल्याचें दिसतें.

विद्यार्थ्यांनीं स्थापन केलेल्या 'रिक्रिएशन क्लब' तर्फे सुटीचे दिवशीं निरनिराळ्या ठिकाणीं सहलीचे कार्यक्रम आखण्यांत येतात.

### मुंबई प्रांतांतील कारखाने व कामगार

मुंबई प्रांतांतील सर्व कारखान्यांत मिळून १९२२ सालीं १५,७६६ मुलें कामावर होतीं, त्यापैकीं कापडाच्या गिरण्यांत १३,९२७ होतीं. १९४१ सालीं त्यांचा आकडा अनुक्रमें ४९२ व ६७ असा झाला. कामगारांची एकूण संख्या १९२१ सालीं ६,५१,३२४ होती ती १९४१ सालीं ७,११५२५ झाली. कापडाच्या गिरण्यांतील कामगारांना १९३८ चे मानानें १९४३ सालीं १००% जास्त वेतन मिळालें. १९३८ सालीं १६०२ कारखान्यांतील ४,५८,९८४ कामगारांना १४ कोटि, ९८ लक्ष रुपये मजुरी मिळाली; १९४३ सालीं २,१७३ कारखान्यांतील ६,५५,७३७ कामगारांना ४६ कोटि ५८ लक्ष रुपये मजुरी मिळाली. म्हणजे १,९६,७५३ अधिक कामगार काम करीत होते व ३१ कोटि ६० लक्ष जास्त रुपये व्यवहारांत आले. अपघातांची संख्या १६,१९० ची १९,५२० झाली.

### युरोपांतील युद्ध संपतांच विमानमार्गें इंग्लंडशीं दळणवळण सुरू

युरोपांतील युद्ध लवकर संपणार, अशीं चिन्हें दिसत आहेत. त्याचें प्रत्यंतर वर्तमानपत्रांतील जाहिरातींत आढळूं लागलें आहे. युरोपांत शांतता प्रस्थापित झाल्यावर ज्यांना इंग्लंडला विमानमार्गें जाण्याची इच्छा असेल, त्यांनीं टाटा एअर लाइन्सकडे आपलीं नांवें नोंदवावीं, अशी जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. मुंबई ते कराची भाडें १८० रुपये ( जातांयेतां ३२४ रुपये ) व कराची ते इंग्लंड भाडें १५१ पौंड ( जातांयेतां ३०२ पौंड ) असें ठेवण्यांत आलें आहे.

### प्रांतिक कर्जें-अंडररायटर्सकडे मागणी

मुंबई, मद्रास, मध्यप्रांत, संयुक्त प्रांत, सिंध व पंजाब ह्या सहा प्रांतांच्या कर्जांची विक्री मंगळवारीं दिवसभर चालू होती. जनतेकडून आलेली मागणी पुरी पडल्यावर अंडररायटर्सना कांहीं रकमेचीं कर्जें स्वतः घ्यावीं लागलीं व अशा रीतीनें कर्जाची भरपाई झाली.

### औद्योगिक संशोधनाची इन्स्टिटयूट

हैद्राबाद येथें औद्योगिक संशोधनाची इन्स्टिटयूट स्थापन करण्याकरितां निजाम सरकारनें १५ लक्ष रुपये मंजूर केले आहेत. शिक्षणासाठी ब्रिटिश हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेर विद्यार्थी पाठविण्याचा निजाम सरकारचा विचार आहे.

## जमाखर्चाची सिंगल एन्ट्री व डबल एन्ट्री पद्धती

जमा व खर्च या दोन्ही दृष्टींनीं प्रत्येक व्यवहाराची नोंद जमाखर्चांत करण्याच्या पद्धतीस 'डबल एन्ट्री' सिस्टीम असें म्हणतात. या पद्धतीनें जमाखर्च लिहिण्यास व्यक्तीच्या व धंद्याच्या दृष्टीनें आवश्यक अशी नोंद एके ठिकाणीं सांपडते. तसेंच त्यामुळें कोणत्याहि वेळीं धंद्यांत नफा अगर तोटा किती झाला हें बिनचूक काढतां येतें व अशा रीतीनें काढलेला ताळेबंद हा धंद्याची बिनचूक आर्थिक परिस्थिति दर्शवितो.

प्रत्येक वेळीं होणारा व्यवहार रोखीनेंच होतो असें नाहीं. कित्येक वेळां माल उधार आणला जातो अगर मालांतच नुसती अदलाबदल होते. रोखी ऐवजीं चेकनेंच व्यवहार होतात व अशा तऱ्हेनें दिले घेतलेले चेकहि नेहमीं वटतातच असें नाहीं. सध्यांच्या या प्रचंड व्यापारी उलाढालींत परस्पर 'पत' व 'विश्वास' यांच्या सहाय्यानें लोकांमधील व्यवहारांचें स्वरूप एकसारखें बदलत आहे व या सर्व व्यवहारांच्या नोंदी सुसंगतवार जमाखर्चांत मांडणें अत्यंत आवश्यक असतें.

व्यवहाराच्या सारखेपणावरून आपण खातीं पाडतों. या खात्यांचे सारखेपणावरून त्यांचे तीन प्रकार पडतात. व्यक्तींचा संबंध येणारीं तीं व्यक्तिविषयक, धंद्यांत गुंतविलेल्या जिंदगीसंबंधींचीं तीं Real अगर Property विषयक खातीं व धंद्यांतील उत्पन्नाचीं व खर्चाचीं जीं खातीं तीं नाममात्र अगर नॉमिनल खातीं. यांना नफातोटाविषयक खातीं असेंहि म्हणतां येईल. ताळेबंदाचे वेळीं नफातोटा काढल्यानंतर हीं नफातोटाविषयक खातीं दरसाल बंद करून पुन्हां उघडलीं जातात.

सिंगल एन्ट्री पद्धतींत ज्या खतावण्या लिहिल्या जातात त्यामध्यें फक्त व्यक्तिविषयक खातींच उघडलीं जातात व प्रत्येक व्यक्तिविषयक येण्यादेण्याचाच तपशील या खतावण्यांतून असतो. समजा अ नें दकडून ५० रुपयांचा माल उधार आणला तर डबल एन्ट्री पद्धतीप्रमाणें अ आपल्या वहींत बचे खातीं ५० रुपये जमा करील व माल खातीं ५० रुपये नांवें टाकील व अशा तऱ्हेनें या व्यवहाराची नोंद स्पष्टपणें सांपडेल पण सिंगल एन्ट्री पद्धतीनें ठेवलेल्या खतावणींतून बचे खातीं ५० रुपये जमा केलेले आढळतील व मालाचें खातें खतावणींतच नसल्यानें त्याचा उल्लेख खतावणींत सांपडणार नाहीं. डबल एन्ट्री पद्धतीप्रमाणें सिंगल एन्ट्री पद्धतींत माल-खरेदी-विक्री, पगार, भाडें इ. खात्यांचा खतावणीशीं संबंधच नसल्यानें फार गैरसोयी होतात. नफातोट्याच्या खात्यांची खतावणी नसल्यामुळें वाटेल त्या वेळीं नफातोटा किती झाला हें नक्की काढतां येत नाहीं. उत्पन्नाच्या व खर्चाच्या खात्यांची निरनिराळी काय परिस्थिति होती हेंही कळत नाहीं. तसेंच फायदा व तोटा कोणत्या बाबींपासून झाला हें समजत नाहीं. अमुक एका विशिष्ट जिंदगीवर किती खर्च झाला, तीवर घसारा किती काढला, कोणत्या बाबींकरितां किती रकम राखून ठेविली होती हेंही समजत नाहीं. चालू साळच्या भांडवलांत वाढ झाल्यास तितका नफा व तूट आल्यास तितका तोटा असेंच ढोबळपणें सांगतां येतें. सदोष पद्धतीमुळें अफरातफरीस जागा राहते व त्यामुळें सिंगल एन्ट्री पद्धतीनें काढलेला ताळेबंद धंद्याची बिनचूक आर्थिक परिस्थिति दाखवील असेंही खात्रीनें सांगतां येणार नाहीं.

एच. व्ही. सहस्रबुद्धे.

## सांप्रतच्या धान्याच्या किंमत वाढीमुळें शेतकऱ्यांकडून येणाऱ्या कर्जाच्या परतफेडीवर व त्यांच्या सर्वसाधारण आर्थिक परिस्थितीवर झालेल्या परिणामासंबंधीं चर्चात्मक रिपोर्ट

[ रावसाहेब य. द. खोले, चेअरमन, पुणें सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक लि. व श्री. बा. वि. कुंभारे यांनीं जातीनें सर्व माहिती संकलित करून हा अहवाल तयार केलेला आहे. याबाबतींत प्रि. ध. रा. गाडगीळ यांजकडून मिळालेल्या अमूल्य मार्गदर्शकत्वाबद्दल लेखकद्वय त्यांचे अत्यंत ऋणी आहेत. शिवाय सदर माहिती मिळवणेसाठी श्री. एजंट, इंदापूर शाखा, पुणें सेंट्रल कॉ-आपरेटिव्ह बँक लि. व सेक्रेटरी वडापुरी को. के. सोसायटी यांनीं केलेल्या सहाय्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. ]

धान्याच्या किंमत वाढीनें खरोखरीच आपल्या शेतकरी बांधवांना हात दिला आहे किंवा कसें व तसें असल्यास ही सुस्थिति किती प्रमाणांत त्यांना लाभलेली आहे याची सांगोपांग पहाणी व छाननी करणें निःसंशय फलप्रद होईल. शेतकरी बांधवांना मिळालेल्या जादा मिळकतीचा विनियोग त्यांनीं सोसायटीच्या कर्जफेडीकडे किती प्रमाणांत केला आहे व तसेच खाजगी कर्जाची फेड, टिकाऊ स्वरूपाची जमीन सुधारणा व शेतीच्या आयुधांची नवी खरेदी यापायीं किती प्रमाणांत पैसा गुंतविणे त्यांना शक्य झालें आहे हें पाहून त्यांची सध्यांची परिस्थिति संपन्नावस्था अगर विपन्नावस्था दर्शविते हें ठरवणें आपणांस शक्य आहे. तरी या दृष्टीनें इंदापूर तालुक्यांतील वडापुरी सोसायटीची हल्लींची परिस्थिती कशी आहे, हें त्या सोसायटीच्या कांहीं सभासदांच्या सद्यःस्थितीची वैयक्तिक छाननी करून स्थूल मानानें अजमावण्याचा प्रयत्न येथें केलेला आहे.

### वडापुरी

वडापुरी हें इंदापूर तालुक्यांतील साधारण १५०० वस्तीचें लहानसें खेडें आहे. गांवची जमीन एकूण ७२०० एकर भरते व त्यापैकी एक तृतीयांश बागाईत स्वरूपाची आहे. येथून नाजिकच निरेचा लेफ्ट बँक कॅनॉल वहातो व त्यानें गांवची एक तृतीयांश जमीन आठमाही ब्लॉक पद्धतीनें भिजते. ह्या गांवच्या मुख्य जिराईत पिकांत ज्वारी, गहूं, बाजरी, करडी व सर्व प्रकारच्या डाळी यांचा समावेश होतो. उरलेल्या बागाईत जमिनींत मुसुंबीं, लिंबें वगैरे फळफळावळ केली जाते.

वहातुकीचें साधन म्हणून भाड्याच्या बैलगाडीचा सरसहा उपयोग केला जातो. हा येथील लोकांचा दुय्यम प्रकारचा पण महत्त्वाचा धंदा समजला जातो.

गांवची एकूण वार्षिक सरकार पट्टी रु. ३३०० आहे.

येथें को. के. सोसायटी तारीख ९।३।१९२६ ला स्थापन झाली. तिचा रजिस्टर नं. ५३३० आहे. सध्या सभासदांची संख्या १०३ म्हणजे येथील शेतकरी समाजाच्या साधारण एक तृतीयांश आहे असें समजण्यास हरकत नाहीं. सोसायटीला १९४३ सालीं क वर्ग मिळाला होता.

सदर विवेचनासाठी १६ सभासदांच्या वैयक्तिक परिस्थितीची सर्व माहिती गोळा केलेली आहे. हा आकडा म्हणजे एकूण शेतकरी समाजाच्या ५ टक्के होय अगर सोसायटीच्या सभासदांच्या संख्येच्या जवळ जवळ १५ टक्के होय. ह्या १६ सभासदांची वर्णवारी त्यांना धान्याच्या किंमतवाढीमुळें प्राप्त झालेल्या निरनिराळ्या सुस्थितीवरून खाली केलेली आहे.

ताळेबंदाच्या आकड्यांवरून जीं अनुमानें काढतां येणें शक्य आहे तीं खालीलप्रमाणें आहेत.

१. मेंबरांच्या ठेवी: ठेवीचा आंकडा ३९-४० सालीं रु. १७३२ होता तो ४३-४४ सालीं १३६१ झाला. ठेवी कमी झाल्या याचा अर्थ असा नव्हे, कीं, सभासदांची सांपत्तिक परिस्थिति निकृष्ट झाली. उलट सभासदांनीं बराच पैसा कर्ज परतफेडीकडे, जमीन खरेदीकडे, व मंगल कार्याकडे गुंतवूनही त्यांना इतक्या ठेवी ठेवता आल्या हें त्यांच्या सुस्थितीचें लक्षण निश्चित होय.

२. रिझर्व फंड: ३९-४० सालीं सदर फंड रु. ५३१२ होता व ४३-४४ सालीं हा रु. ६३०५ झाला. रु. १००० जास्त रकम सभासद गंगाजळींत टाकूं शकले हें त्यांच्या सुधारणेचें द्योतक आहे. ही त्यांच्या जिंदगींत झालेली कायम वाढ आहे हेंही यावरून स्पष्ट होतें.

३. बँकेकडून सोसायटीस कर्ज: ३९-४० सालीं हें कर्ज रु. १२४७२ इतकें होतें. तें ४३-४४ सालीं पूर्ण फेडलें गेलें आहे. सध्याची आर्थिक सुस्थिति या आकड्यानें निर्विवादपणें सिद्ध होते.

४. मेंबर्स येणें: हा आंकडा ३९-४० सालीं रु. ३०८३५ वरून ४३-४४ सालीं रु. १०,६४४ झाला.

५. बँकेकडून मागितलेलें कर्ज: हा आंकडा ३९-४० सालीं रु. २३३१ होता व ४३-४४ सालीं रु. ६६५ इतका खालीं आला. सभासदांना सध्यां कर्जाची आवश्यकता किती अल्प प्रमाणांत आहे याबद्दल हे आंकडे खात्री पटवतात.

६. बँकेस परत केलेलें कर्ज: ३९-४० सालीं परत केलेल्या कर्जाचा आंकडा रु. ३८५३ होता. तो ४३-४४ सालीं रु. ८४४८ पर्यंत चढला आहे. हें सभासदांच्या कर्जफेडीच्या वाढत्या कार्यक्षमतेचें निदर्शक होय असें समजण्यास प्रत्यवाय नाहीं असें वाटतें.

७. नफातोटा खातें: ३९।४० सालीं व ४२ साल अखेर सदर सोसायटी तोट्यांत चालली होती. पुढील दोन वर्षांत प्रगति करून सोसायटीनें प्रतिवर्षांत रु. १००० नफा दाखवला व सध्याची सुस्थिती हक्कानें प्राप्त करून घेतली आहे.

वडापुरीसंबंधीची वरील माहिती असें सिद्ध करतें कीं, धान्याच्या किंमत वाढीमुळें सदर गांवच्या शेतकऱ्यांचा चांगलाच फायदा होऊन त्यांची स्थिति या काळांत दृश्य स्वरूपांत सुधारली आहे. मागच्या वर्षी सदर सोसायटीस तपासणींत ड वर्ग मिळाला होता व असिस्टन्ट रजिस्ट्रार साहेब यांनीं त्यांत अशी सूचना केली होती कीं सभासदांच्या कर्जाची बाकी पुढील वर्षी म्हणजे यावर्षी धान्याच्या किंमत वाढीमुळें त्यांना मिळालेल्या जादा मिळकतींतून वसूल करून घ्यावी. सदर सूचनेचें प्रत्यक्षांत रूपांतर होऊन आतां सोसायटीकडे कर्जाची बाकी कांहींही नाहीं व याच कारणाच्या आधारावर सोसायटीस येत्या तपासणींत बरचा वर्ग मिळेल अशी आशा बाळगण्यास कांहींच हरकत नाहीं.

वडापुरी सोसायटीच्या सभासदांच्या अंदाजी उत्पन्नाचे आकडे वाढ दाखविण्याऐवजी घटलेले असल्याचे आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें. वरवर पहाता सोसायटीच्या सभासदांची सांपत्तिक परिस्थिति सुधारत आहे या विधानाशीं हे आंकडे


विसंगत दिसतात हें खरें आहे. परंतु हे आकडे त्यांच्या वार्षिक धान्य उत्पन्नाचे शास्त्रशुद्ध मार्गानें केलेलें आर्थिक मूल्यमापन नसून सोसायटीच्या सभासदांनीं बँकेकडे कर्ज मागणीचा अर्ज करतेवेळीं स्वतःच्या उत्पन्नाचा अनभिज्ञपणें अंदाजी कल्पना करून सांगितलेले असतात एवढें येथें नमूद केलें म्हणजे ही विसंगती दूर होईल. कित्येक वेळां सभासदांमध्यें असणारा साक्षरतेचा अभाव हेंही कारण त्यांनीं दिलेल्या परस्पर विरोधी आकड्यांच्या बुडाशीं असणें शक्य असतें. त्यापैकीं कांहीं जरी साक्षर असले तरी सर्वांनाच चोख व पद्धतशीरपणें पैशाच्या व्यवहाराची नोंद ठेवतां येत नाहीं, हें सर्वश्रुत आहे. तेव्हां त्यांनीं अंदाजलेल्या आंकड्याकडे विशेष काटेकोर दृष्टीनें न पाहतां योग्य तोच अर्थ त्यांतून काढणें श्रेयस्कर होईल.

सभासदांना मिळालेल्या जादा प्राप्तीचा अनुत्पादक कार्यापायीं विनियोग करण्याकडे त्यांची साहजिक वृत्ति असल्याचें आपणांस स्पष्ट दिसतें. एक तर हें मानवी स्वभावाच्या सर्वसाधारण वैगुण्याचें आविष्करण होय असें म्हणावें लागतें व त्याहूनही अधिक खरें कारण म्हणजे शेतकीच्या उत्पादन वाढीच्या नव्या क्षेत्राबद्दल सर्वसाधारण सभासदांचें अज्ञान असतें हें होय व पैसा हातीं असूनही व जमीनीचें उत्पादन वाढविण्याची प्रबळ इच्छा मनांत वसत असूनही पैशाचा उपयोग सत्कार्यी करणें त्यांना दुरापास्त होते. ही सध्यांची परिस्थिति असमाधानकारक आहे हें तर खरेंच; परंतु ती बदलण्यासाठी शेतकरी सभासदांना उत्पादन-वाढीचे नवे मार्ग कोणते याचें ज्ञान देणें जरूर आहे, व तें कोण-कोणत्या उपायानें यावयाचें याचा सूक्ष्म विचार तज्ज्ञाकडून होणें इष्ट व फलदायी होईल.

वढापुरी सोसायटीच्या सभासदांसंबंधी गोळा केलेल्या माहितीची व्याप्ति अल्प असल्यामुळें त्यावरून काढतां येणारीं अनुमानें सर्व-साधारण स्वरूपाचीं असणार नाहींत हें उघड आहे. वास्तव वढा-पुरीसंबंधीचे आकडे तेथील सभासदांच्या आर्थिक परिस्थितीचे सर्व बाजूंनीं दिग्दर्शन करणारे आहेत असें म्हणणें धाडसाचें होईल. व तसें म्हणण्याचा येथें मानसही नाहीं. तसें करावयाचें झाल्यास याहीपेक्षा विशाल व्याप्तीची व खोलवर अशी आर्थिक चौकशी आपणांस करावी लागेल. प्रस्तुत 'पहाणींत' सभासदांची कर्ज परतफेडीची कार्यक्षमता सध्याच्या किंमतवाढीमुळें वाढली आहे किंवा कसें एवढेंच पहाण्याचें योजिलें होतें व त्यामुळें वढा-पुरीची माहिती केवळ त्या दृष्टीनेंच गोळा केलेली आहे इकडे वाचकांचें लक्ष वेधणें जरूर आहे.

वढापुरीच्या सभासदांची सुधारणा जरी उल्लेखनीय असली तरी त्या माहितीच्या आधारावर अवास्तव आशावादीपणा बाळगणें युक्त होणार नाहीं. वढापुरी सोसायटी ही पुणें जिल्ह्यांतील सध्याच्या आर्थिक परिस्थितीचें प्रातिनिधिक स्वरुप दाखवते असें म्हणणें सत्यास धरून निश्चित होणार नाहीं. वढापुरी सोसायटी ही पुणें जिल्ह्यांतील एक हल्लींच्या युद्धजन्य कारणानें सुधारलेल्या सांपत्तिक परिस्थितीचें उत्तम प्रतीचें विशिष्ट उदाहरण होय व तिच्याबद्दल अल्प माहितीचा योग्य तोच अर्थ सारासार विचार-बुद्धीनें लावणें जरूर आहे; एवढी सूचना येथें देणें खास अस्थानीं होणार नाहीं.


'करा प्रपंच नेटका'
कर्तव्याचा कोयता !




डेक्कन—५ वा आठवडा—अपॉलो

व्ही. शांताराम आणि राजकमल यांची दुसरी कलाकृति
कथा:- स. अ. शुक्ल
भक्तीचा मळा
दिग्दर्शक : केशवराव दाते [माळी] प्रोड्युसर : व्ही. शांताराम
भूमिकाः—मा. कृष्णराव, बेबी नलिनी, अमीर कर्नाटकी.
डेक्कनमध्यें दररोज फक्त २ खेळ सायं. ७ व रात्रौ १० वा.
दर शनि. रवि. व सोमवारीं जादा खेळ दुपारीं ४ वाजतां
सर्व खेळ मराठी. बोलपट-भक्तीचा मळा.
अपॉलो—{ दररोज फक्त १ खेळ रात्रौ ११ वाजतां मराठी बोलपट.
रिझर्वेशन दररोज सकाळीं १० ते १२ फ्री व कॉम्प्लिमेंटरी पासेस आजिबात बंद.

डेक्कनमध्यें रविवार ता. ३ सप्टेंबर रोजीं सकाळीं १०-३० वाजतां,
(वार्नर ब्रदर्स) स्पेशल मॉर्निंगशो
BETTY DAVIS IN "NOW VOYAGER"


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व ना. धोंडो वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.